विषयः- कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत. ( खाजगी दवाखान्यातील बाहय रुग्णसेवा चालु ठेवण्यासाठी परवानगी देणेबाबत..)

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१/को./सीआर-
दि. २३/०३/२०२०

वाचाः-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.

३) नांदेड जिल्हयातील बाहय रुग्ण सेवा बंद ठेवण्याबाबतचे या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दि.२१.०३.२०२०.

४) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दिनांक २३.०३.२०२०

**सुधारीत आदेशः-**

ज्याअर्थी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

आणि त्याअर्थी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्यानुसार या कार्यालयाचे संदर्भ ३ नुसार नांदेड जिल्हयातील बाहय रुग्ण सेवा बंद ठेवण्याबाबतचे आदेशात संदर्भ क्रमांक ४ वरील अधिसुचनेच्या अनुषंगाने अंशतः बदल करुन खालील नांदेड जिल्हयातील वैद्यकीय सोयीच्या दृष्टीकोनातुन सर्व खाजगी दवाखाण्यातील बाहय रुग्ण सेवा खालील अटींचे अधीन राहून सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

१) ओ.पी.डी. मध्ये रुग्णांची गर्दी होणार नाही, याकार्यालयाने वेळोवेळी दिलेले निर्देशाचे कटाक्षाने अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी.

२) रुग्णांना एकमेकास संसर्ग संक्रमित होणार नाही याची विशेष काळजी घेवून तशा प्रकारची काळजी घेण्यात यावी.

३) कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने आवश्यकता भासल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलम ६५ चा वापर करुन खाजगी वैद्यकीय

व्यवसायीक त्यांचे अधिनस्त कर्मचारी व इमारत परिसर आणि तत्सम संसाधने अधिगृहीत करण्यात येईल.

४) कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने ओपीडी मध्ये तपासणीसाठी येणा-या रुग्णांना कोरोना विषाणू संदर्भात प्रबोधन करण्यात यावे.

सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

(डॉ. विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी, नांदेड

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
२) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३) पोलीस अधीक्षक, नांदेड
४) अध्यक्ष, इंडीयन मेडीकल असोसिएशन, नांदेड
५) जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड
६) जिल्हा आरोग्य अधिकारी, नांदेड
७) सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,नांदेड
८) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
९) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
१०) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपंचायत, जि.नांदेड
११) सर्व संबंधित विभाग प्रमुख ----------------------

**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**